# 26 फेब्रुवारी

**आजचा सुविचार :**

अडचणीच्या वेळेत सगळ्यात मोठा आधार म्हणजे स्वत:वरचा विश्वास जो मंद हास्य करत तुमच्या कानात प्रेमाने सांगत असतो सगळं व्यवस्थित होईल.”

**आजचे पंचांग :**

वार – शनिवार | दिनांक : 26 फेब्रुवारी 2022

मास – माघ | नक्षत्र – मूळ

सुर्योदय – सकाळी 6.55 वाजता | सूर्यास्त – सायंकाळी 6. 39 वाजता

**आजचे दिनविशेष :**

1966 ला देशाचे स्वातंत्र्य सैनिक विनायक दामोधर सावरकर यांचे निधन.

2019 ला आजच्या दिवशी पुलवामा हल्ल्याच्या १२ दिवसानंतर भारतीय वायुसेनेने पाकिस्तान मध्ये जाऊन आतंकवाद्यांचे लाँचपॅड उडवून टाकले.

**आजचे इंग्लिश शब्द :**

1) Earth – पृथ्वी   2) Ear - कान   3) Education – शिक्षण   4) Effect – परिणाम

**आजची प्रश्नमंजुषा :**

1) तुमच्या वर्गात किती विद्यार्थी आहेत?

2) पाण्यात आणि पाण्याबाहेर राहणारे प्राणी कोणते?

3) सकाळच्या सूर्य किरणातून आपल्याला कोणते जीवनसत्व मिळते?

4) आपल्या देशात किती राज्ये आहेत?

**बोधकथा :**

## गवळण आणि तिच्या घागरी

राधा गवळणीने गाईचे दूध काढले आणि तिच्याकडे दोन घागरभर साईचे दूध जमा झाले. तिने दोन्ही घागरी काठीला टांगल्या आणि बाजाराकडे दूध विकण्यासाठी निघाली. वाटेवर चालताना ती घागारींमध्ये जमा झालेल्या दुधाचा आणि त्यातून मिळणाऱ्या पैशांचा विचार ती करू लागली. “जेंव्हा मला पैसे मिळतील तेंव्हा मी कोंबड्या विकत घेईन.”

तिने विचार केला, “कोंबड्या अंडी घालतील आणि मला अजून अंडी मिळतील, त्या सगळ्या कोंबड्या अंडी घालतील आणि ती विकून मला अजून पैसे मिळतील. मग मी टेकडीवर घर घेईन , गावातील सगळेजण माझा हेवा करू लागतील.”

ते मला विचारातील, “तुला पोल्ट्री फार्म विकायचा आहे का ?” पण मी डोक असं हलवून नकार देईन असं म्हणत असतानाच राधा गवळणीने तिचे डोके हलवले आणि तिच्या घागरी पडल्या, सगळे दूध जमिनीवर सांडलेले पाहून राधा रडू लागली.

तात्पर्य – पेरल्याशिवाय उगवणार नाही.